# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## जाहीर आवाहन

मा.राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत रमाई आवास योजना राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत नागरीकांना त्यांच्या मालकीच्या खुल्या जागेवर ३० चौ.मी. क्षेत्रफळ बांधकामासाठी २.५० लक्ष अनुदान देण्यात येते. सदर योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील इच्छूक नागरीकांना अहमदनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात येते की खालील निकषामध्ये पात्र होणा-या नागरीकांनी सदर योजनेचा लाभ घेण्यात यावा.

१) लाभार्थी अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांमधील असावा. त्यासाठी त्याने जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२) लाभार्थीचे वार्षिक उत्पन्न कमाल मर्यादा ३ लाख

३) लाभार्थ्याची स्वत:ची जागा असावी किंवा स्वत:चे कच्चे घर असावे.

४) महानगरपालिका क्षेत्रात त्यांचे १५ वर्षे वास्तव्य असावे.

लाभार्थ्याने उपरोक्त योजनेचा लाभ घेणे कामी विहीत नमुन्यातील अर्ज नविन प्रशासकीय इमारत, नगर-छत्रपती संभाजीनगर रोड, मनपा प्रकल्प विभाग येथे उपलब्ध असून अर्जा सोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१) अर्जदाराचा स्वत:चा प्राधिकृत अधिका-यानी दिलेला जातीचा दाखला (साक्षांकित प्रत)

२) तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला (साक्षांकित प्रत)

३) जागेचा उतारा (साक्षांकित प्रत)

४) घरपट्टी /विद्युत बिलाची (छायांकित प्रत)

५) रेशन कार्डाची (छायांकित प्रत)

६) निवडणुक ओळखपत्राची (छायांकित प्रत)

७) आधारकार्डची (छायांकित प्रत)

८) सध्याच्या कच्या घराचा / खुल्या जागेचा फोटो

९) मनपाची बांधकाम परवानगी.

१०) जातीय दंगल /अॅट्रॉसिटी पिडीत/पुरग्रस्त /विधवा/शासकीय अभिकरणामधून निवड झालेली व्यक्ती यापैकी असल्यास पुरावा जोडावा.

उपायुक्त
अहमदनगर महानगरपालिका